राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियान (NMAET) चे उप अभियान कृषि विस्तार (SAME) अंतर्गत राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणाकरिता सहाय्य (आत्मा) योजना अंतर्गत सन २०१७-१८ चा आत्मा कार्यक्रम कृषि आयुक्तालय स्तरावर राबविण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत ...

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः कृविका-०११८/प्र.क्र. ५७/३-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक: **१६ मार्च, २०१८**

वाचा -

१) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. कृविका-०११७/प्र.क्र. १२/३-अे, दि. ०८ जून, २०१७
२) कृषि व पदुम विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. कृविका-०११७/प्र.क्र. १२/३-अे, दि. ३० डिसेंबर, २०१७
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र. ७५/अर्थ-३, ०६ फेब्रुवारी, २०१८

प्रस्तावना -

उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ मध्ये राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा करीता सहाय्य (आत्मा) योजना राबविण्यासाठी रु. १०३१४.७८ लक्ष एवढया एकमेच्या कार्यक्रमास दि. ८.६.२०१७ च्या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर योजनेसाठी केंद्र शासनाकडून ६०% हिश्यानुसार पहिल्या हप्त्यापोटी प्रवर्ग निहाय (सर्वसाधारण प्रवर्ग रु. १८३०.३९ लक्ष, अनुसूचित जाती प्रवर्ग रु. २३०.७८ लक्ष व अनुसूचित जमाती प्रवर्ग रु. २०१.३६ लक्ष) असा एकूण रु. २२६२.५३ लक्ष प्राप्त झालेला निधी कृषि आयुक्त कार्यालयास वितरीत करण्यात आलेला आहे.

तसेच उपरोक्त संदर्भ क्र. २ येथील शासन शुद्धीपत्रकान्वये सन २०१७ -१८ चा आत्मा कार्यक्रम कृषि आयुक्तालय स्तरावर राबविण्यासाठी राज्य हिश्याचा ४० % निधी म्हणजेच रु. ३१.३७ लक्ष तरतूद (२४०१ ४४३६) या लेखाशिर्षाखाली कृषि आयुक्त कार्यालयास अर्थ संकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आली होती. आता उपरोक्त संदर्भ क्र. ३ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रकानुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार सन २०१७ -१८ चा आत्मा कार्यक्रम कृषि आयुक्तालय स्तरावर राबविण्यासाठी एकूण अर्थसंकल्पिय तरतूदीच्या १००% म्हणजेच रु. ४४.८२ लक्ष तरतूद (२४०१ ४४३६) या लेखाशिर्षाखाली कृषि आयुक्त कार्यालयास वितरीत करणे आवश्यक आहे. तथापि यापुर्वीच रु. ३१.३७ लक्ष तरतूद (२४०१ ४४३६) या लेखाशिर्षाखाली कृषि आयुक्त कार्यालयास उपरोक्त संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयाअन्वये वितरीत करण्यात आली आहे . सबब सन २०१७ -१८ चा आत्मा कार्यक्रम कृषि आयुक्तालय स्तरावर राबविण्यासाठी रु. १३.४५ लक्ष एवढी तरतूद वितरीत करणे आवश्यक आहे. तदनूसार शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय -

सन २०१७-१८ चा आत्मा कार्यक्रम कृषि आयुक्तालय स्तरावर राबविण्यासाठी राज्य हिश्याचा (४०%) निधी म्हणजेच ₹. १३.४५ लक्ष (रुपये तेरा लक्ष पंच्चेचाळीस हजार फक्त) इतका निधी मागणी क्र. डी-३, २४०१, पीक संवर्धन, १०९ विस्तार प्रशिक्षण, (०१) (४४) राज्याच्या कृषि विषयक कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा करिता सहाय्य (राज्य हिश्याचा ४०%) (२४०१ ४४३६) ३३ अर्थसहाय्य या लेखाशिर्षखाली कृषि आयुक्त कार्यालयास वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे

२. हे आदेश वित्त विभागाने दि.०६.०२.२०१८ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१६१४२७४८४५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakumar Vithal Ghaytadak

Digitally signed by Chandrakumar Vithal Ghaytadak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=034948ccd1f6b6c67380c817b34a9af75fcfa679a4609321f9da27d9ab87b0d1, cn=Chandrakumar Vithal Ghaytadak
Date: 2018.03.16 16:10:12 +05'30'

(चं.वि.घायतडक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, (कृषि) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. सर्व मा. विधानमंडळ सदस्य
४. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
५. सर्व प्रकल्प संचालक (आत्मा)
६. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
७. कृषि विकास अधिकारी, सर्व जिल्हा परिषद
८. अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई
९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१०. महालेखापाल-१/२(लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
११. सर्व विभागीय आयुक्त
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषद
१४. वित्त विभाग (व्यय-१) (अर्थसंकल्प-१२)(अर्थोपाय),मंत्रालय,मुंबई-३२
१५. कार्यासन अधिकारी, २- अे, १५-अे, १६-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. निवड नस्ती का-३अे.